कायम विनाअनुदान तत्त्वावर
(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/५०४/२०१७
पुणे १ दिनांक:-१४/०६/२०१७

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कुल,
तळेगांव दाभाडे ता.मावळ जि.पुणे

**विषय:-** **विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता २ री ते इ.७ वीचा वर्ग जोडण्यास मान्यता परवानगी देणेबाबत.**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. प्राशापु-१११२/(२५८/२०१३)/प्राशि ३ मंत्रालय मुंबई दि. २/०७/२०१३.
२) शालेय शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशधो-२०१४/(१८१/२०१४) एमएम-५ दि. २४/०३/२०१५.
३) शासन निर्णय क्र.प्रशातु-२०१५/प्र.क्र.४४/१५/एसएम-५ दि. १० मार्च २०१६.
४) मा. शिक्षण उपसंचालक, शिक्षण संचालयनालय पुणे विभाग पुणे यांचेकडील मान्यता आदेश जा.क्र. शिउसं/प्राथ-३/नखाप्राशा/पुवि-०९/२९००८/१२ दि. २/१२/२००९

संदर्भ क्र. १ अन्वये खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या इयत्ता २ री ते इ.७ वीचा वर्ग जोडण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कुल, तळेगांव दाभाडे ता.मावळ जि.पुणे | इंग्रजी | इयत्ता २ री ते ७ वीच्या वर्गास मंजूर | विना अनुदान तत्वावर मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
२. या आदेशान्वये ज्या शाळांना वर्ग मंजूर करण्यात आलेले आहे त्या शाळांची पटसंख्या विहीत निकषांप्रमाणे असल्यांची खात्री संबंधित गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पुरंदर यांनी करावी.
३. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९अन्वये शाळांनी भौतिक सोयीसुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
४. या आदेशान्वये मान्यता प्राप्त खाजगी कायम विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता २ री व इयत्ता ७ वीचा अतिरिक्त वर्गांना शासन मान्यता दिल्यामुळे अनुदानाचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही. या वर्गांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असुन निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.
५. तसेच संदर्भाधिन क्र. (५) येथील दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये नैसर्गिक वाढ बंद करण्यात आलेली असल्याने इयत्ता ८ वी नंतर प्रस्तुत शाळांना नैसर्गिक वाढ लागू राहणार नाही.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

प्रत :- माहितीसाठी रवाना
१.सचिव/अध्यक्ष :- सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कुल, तळेगांव दाभाडे ता.मावळ जि.पुणे
२. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मावळ जिल्हा परिषद पुणे